
डॉ.एस.व्ही.खांदेवाले गौरव ग्रंथ

# भारतातील आर्थिक सुधारणांची २५ वर्षे



दि.व्यं.जहागि...
संपादक

Govt. College of Arts & Science

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

# भारतातील आर्थिक सुधारणांची २५ वर्षे
## Bharatatil Arthik Sudharnanchi Panchvish Warshe


- ISBN 978-81-921694-7-7

- प्रकाशन क्रमांक : १५

- प्रकाशक :

  सेंटर फॉर एकॉनोमिक ॲन्ड सोशल स्टडीज, अमरावती.
  १२, गुलमोहोर कॉलनी,
  कॅम्प, अमरावती – ४४४६०२
  फोन नं. (०७२१) २६६१८५१



- सर्व हक्क संपादकाकडे ©



- प्रथम आवृत्ती : १७ ऑगस्ट, २०१७

- किंमत ₹ ३००/-

- अक्षर जुळवणी व मुद्रक :

  कॉम्प्युटर नेटवर्क – नरेंद्र पांढरीकर
  ३३, आय.टी. आय. कॉलनी, अमरावती.
  भ्रमणध्वनी – ९८५०२८३२४६



Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

# भारतातील आर्थिक सुधारणोत्तर सामाजिक क्षेत्राचे बदलते स्वरूप

वैशाली देशमुख
सोनल जनबंधू

**प्रास्ताविक :**

प्राचीन काळात भारताची अर्थव्यवस्था विकसित होती. जगातील अनेक देशांसोबत मजबूत व्यापारी संबंध होते. १७७३ ते १९४७ च्या काळात इंग्रज भारतातून स्वस्त दराने कच्चा माल खरेदी करीत होते व पक्का माल भारतीय बाजारात सामान्य मूल्यापेक्षाही जास्त दराने विकत होते. ज्यामुळे संसाधनांचा दुहेरी ऱ्हास होत होता. या काळादरम्यान भारताचा जगातील उत्पन्नाचा हिस्सा १७०० व्या शतकात २२.३ प्रतिशत असणारा कमी होऊन १९५२ मध्ये ३.८ प्रतिशत एवढा घटला. १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर अर्थव्यवस्थेच्या पुनर्निर्माणाची प्रक्रिया सुरू झाली. या उद्देशाने विविध धोरणे व योजना आखल्या गेल्या. पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून त्या कार्यान्वित केल्या गेल्या.

१९५० मध्ये भारताचा विकास दर ३.५ प्रतिशत होता. त्यावेळी अनेक अर्थशास्त्रज्ञांनी हा दर ब्रिटीश राजवटीच्या शेवटच्या ५० वर्षाच्या काळातील विकास दरापेक्षा तिप्पट असल्यामुळे आनंदोत्सव साजरा केला होता. समाजवाद्यांनी याला भारताच्या आर्थिक धोरणांचा विजय असे मानले कारण जी धोरणे अंतर्मुख करणारी व सार्वजनिक क्षेत्राच्या उपक्रमांच्या वर्चस्वाची होती. वास्तविकत: १९६० च्या दशकात ईस्ट इंडियन टायगर (दक्षिण कोरीया, तायवान, सिंगापूर, हाँगकाँग) या देशांनी भारतापेक्षा दुप्पट विकास दर प्राप्त केला होता. या देशांनी बहिर्मुखी व खाजगी क्षेत्राला प्रोत्साहन देणारे धोरण आखल्याचे परिणाम होते. अशा काळात भारताजवळ ८० च्या दशकाऐवजी एक दशक आधी १९७१ मध्येही आर्थिक सुधारणांना स्विकारण्यासाठी योग्य उदाहरण मिळाले होते.

भारतात १९८० पर्यत GNP चा विकासदर कमी होता परंतु १९८१ मध्ये आर्थिक सुधारणा सुरू झाल्यामुळे त्याचा वेग वाढला. १९९१ मध्ये आर्थिक सुधारणा पूर्णत: लागू झाल्यानंतर विकासाच्या वेगाला गती मिळाली. १९५० ते १९८० च्या तीन दशकात GNP चा विकासदर फक्त १.४९ प्रतिशत होता. या कालावधीत सरकारी धोरणांचा आधार समाजवाद होता. १९९० च्या दशकात मात्र आर्थिक उदारमतवादामुळे दरडोई GNP वाढून ४.१९ प्रतिशत पर्यत वाढला. २००१ मध्ये तो ६.७८ प्रतिशत पर्यंत पोहचला.



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

१९९१ मध्ये भारत सरकारने महत्त्वपूर्ण आर्थिक सुधारणा धोरण मांडले ज्यामध्ये विदेशी व्यापार उदारीकरण, वित्तीय उदारीकरण, कर सुधारणा आणि विदेशी गुंतवणूकीबाबत शिथील धोरण समाविष्ट होते. यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेची गती वाढण्यास मदत झाली. सकल देशी उत्पादनाचा सरासरी वृद्धी दर १९५१-९१ च्या दरम्यान ४.३४ प्रतिशत होता तो १९९१ ते २००१ च्या काळात ६.२४ प्रतिशत वर पोहचला. २०१५ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेने २ ट्रिलीयन अमेरिकी डॉलरपेक्षा जास्त चलन मिळविले.

भारतात स्वातंत्र्य प्राप्तीपासूनच सामाजिक विकास व गरीबी कमी करण्याचे प्रयत्न केले जात होते. स्वातंत्र्यानंतर पं.जवाहरलाल नेहरूनी संसदेमध्ये स्पष्ट केले होते की, स्वातंत्र्याचा अर्थ फक्त मुक्तता मिळविणे असे नाही तर ही एक प्राप्तीची सुरूवात आहे. स्वातंत्र्य हे नवीन संधीच्या दृष्टीने एक पाऊल आहे आणि अनेक संधी आपली वाट पाहत आहेत.

या लेखात प्रामुख्याने सामाजिक क्षेत्रासाठी भारत सरकारने केलेल्या कामगिरीचे अध्ययन केले आहे. सरकारचा सामाजिक क्षेत्रावरील व्यय विचारात घेता, सार्वजनिक क्षेत्रावर होणाऱ्या व्ययापैकी फक्त १/५ व्यय केंद्र सरकार तर उर्वरीत ८० प्रतिशत व्यय राज्य सरकारद्वारा केला जातो. आरोग्य व ग्रामीण विकास मुख्यत: राज्यसूचीचे विषय आहेत. आरोग्य, कल्याण, रोजगार हे समवर्ती सूचीचे विषय आहेत. यासाठी केंद्र व राज्य दोन्ही जबाबदार असतात.

या लेखात सामाजिक क्षेत्राशी संबंधित शिक्षण, रोजगार, आरोग्य या मुख्य घटकांचा विचार केला आहे.

**शिक्षण :**

शिक्षणाशिवाय आर्थिक विकास शक्य नाही. मिर्डालच्या मते, ''जास्त लोकसंख्या निरक्षर ठेवून राष्ट्रीय विकासाचे धोरण आखणे निरर्थक असेल.'' मौलाना आझाद यांना असे वाटत होते की, जर देशात एकही व्यक्ती निरक्षर राहिला तर तो देश लोकशाहीपासून बराच दूर राहिले. भारताच्या संविधानात सुद्धा सर्वांसाठी शिक्षण उपलब्ध करून देण्याचे दर्शविले आहे. यात उल्लेख केला आहे की, ''देश या संविधानाच्या सुरूवातीच्या दहा वर्षाच्या कालावधीतच १४ वर्षापेक्षा कमी वयाच्या सर्व मुलांना नि:शुल्क व सक्तीचे शिक्षण देण्यास कटिबद्ध आहे.''

१९६६ मध्ये डॉ. व्ही.एस.कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षणाला प्रगत करण्याच्या हेतूने आयोगाची स्थापना केली गेली. त्यामध्ये शिक्षण व उत्पादकता यांच्या संबंधावर भर दिला. त्यात असे मत मांडले की, मानवी संसाधनात गुंतवणूक करण्याच्या हेतूने शिक्षणावर गुंतवणूक महत्त्वाची आहे जी आर्थिक विकासातही योगदान देते. आयोगाने



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

हे सुद्धा स्पष्ट केले की, पुढील २० वर्षात शिक्षणावर GNP चा ६ प्रतिशत खर्च होणे गरजेचे आहे.

४२ व्या संशोधनानुसार शिक्षण आतापर्यंत राज्यसूची मध्ये समाविष्ट होत होते. ते आता समवर्ती सूचीत मांडण्यात आले. तसेच शिक्षणाला केंद्र व राज्य दोघांची जबाबदारी मानली. भारतात दुसऱ्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत शिक्षणावर २७७ कोटी रू. खर्च केले गेले. तिसऱ्या योजनेत ५६० कोटी रू जे आधीच्या योजनेपेक्षा १०२.१७ प्रतिशत जास्त होते. पाचव्या योजनेत १२८५ कोटी रू., सहाव्या योजनेत २५२४ तर सातव्या योजनेत ५४५७.०९ कोटी रू. शिक्षणावर खर्च केले गेले. नवव्या योजनेत २४९०८ कोटी रू. खर्च केले. अकराव्या पंचवार्षिक योजनेत ३४७३३८ कोटी रू. शिक्षणासाठी खर्च केले.

भारताच्या संविधानात अनुच्छेद ४५ मध्ये सर्वांसाठी प्राथमिक शिक्षण उपलब्ध करण्याच्या हेतूने उल्लेख केलेला आहे. १९९० -९१ मध्ये सार्वजनिक क्षेत्रामध्ये शिक्षणावर स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ०.३०% तर २०००-०१ मध्ये ०.३६% खर्च केला गेला. २००५-०६ मध्ये राज्य व केंद्र सरकारच्या जीडीपीच्या ३.३४% व्यय शिक्षणावर केला गेला. २०११-१२ मध्ये तो व्यय ३.८०% पर्यंत वाढला.

**शिक्षण क्षेत्राचा विकास :**

शिक्षणासाठी विद्यार्थ्यांची नोंदणी, शिक्षकांची संख्या शाळांची संख्या, विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण हे सर्व घटक महत्त्वपूर्ण आहेत. प्राथमिक शिक्षणाला सर्वव्यापी बनविण्याच्या हेतूने २००२ मध्ये संसदेमध्ये ८६ व्या संविधान संशोधनात एक नवीन परिच्छेद समाविष्ट केला. त्यामध्ये ६ ते १४ वर्ष वयोगटातील सर्व मुलांसाठी नि:शुल्क व अनिवार्य शिक्षण हा एक मुलभूत अधिकार मानला.

१९९०-९१ मध्ये भारतात ५,६०,९३५ एवढी प्राथमिक शाळांची संख्या होती. १९९९-२००० मध्ये ६,५१,४३४ पर्यंत वाढली. २००५-०६ मध्ये ही संख्या ७,७२,५६८ एवढी झाली. उच्च माध्यमिक शाळांची संख्या १९९०-९१ मध्ये १,५१,४५६ एवढी होती ती १९९५-९६ मध्ये १,७४,१४५ पर्यंत वाढली. तर २००५-०६ मध्ये २,८८,४९३ एवढी असणारी संख्या २०१३-१४ मध्ये ४,०१,०७९ पर्यंत वाढली.

माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळांचा वृद्धीदर लक्षात घेता १९९०-९१ मध्ये ७९,७९६ एवढी असणारी संख्या १९९९-२००० मध्ये १,१७,९१३ एवढी तर २०१३-१४ मध्ये २,३३,८४५ एवढी वाढली. विद्यापीठांच्या संख्येमध्ये ही मोठ्या प्रमाणात वाढ झाली १९९०-९१ मध्ये भारतात १८४ विद्यापीठ होते, १९९५-९६ मध्ये २२६ तर १९९९-२००० मध्ये २४४ आणि २००५-०६ मध्ये ३५० तर २०१३-१४ मध्ये ७१२ पर्यंत वाढ झाली.

Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

वरील विश्लेषणावरून हे स्पष्ट होते की, आर्थिक सुधारणेनंतर शिक्षण या महत्त्वाच्या घटकांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल घडून आला. शाळांची व शिक्षण घेणाऱ्यांची वाढती संख्या सामाजिक क्षेत्रातील शाळेचा विकास दर्शविते.

१९९०-९१ मध्ये प्राथमिक स्तरावर ९७.४ मिलीयन मुलांची शाळेत नोंदणी झाली होती. १९९५-९६ मध्ये ही संख्या १०७१ मिलीयन पर्यंत वाढली २०००-०१ मध्ये ११३.८ मिलीयन नोंदणी झाली. तर २००५-०६ मध्ये नोंदणी संख्या १३२.१ मिलीयनवर पोहचली.

शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी अनेक प्रकारच्या योजना राबविल्या जातात. प्रामुख्याने सर्व शिक्षा अभियान, मध्यान्ह भोजन योजना, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, गरीब मुलांसाठी आर्थिक सहाय्यता इत्यादी योजनांच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्राचा विकास करण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु आपले प्रयत्न काही प्रमाणात कमी पडतांना दिसत आहेत. फक्त शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ यांची संख्या वाढून चालणार नाही तर अभ्यासक्रमात बदल, विद्यार्थ्यांना आवड निर्माण करणारा आणि विशेष म्हणजे तो विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविणे गरजेचे आहे.

शिक्षणावर केला जाणारा खर्च वाढविणे गरजेचे आहे. अन्य देशांसोबत तुलना करता असे लक्षात येते की, भारतात शिक्षणावर होणारा खर्च अतिशय कमी आहे. भारतात जीडीपी च्या फक्त ३.२% व्यय शिक्षणावर होतो. तर क्यूबासारख्या छोटा देश त्याच्या जीडीपीच्या १३.६, डेन्मार्क ७.९%, नॉर्वे ६.७%, टांझानिया ६.८%, यमन ५.२ % व्यय शिक्षणावर करतात, यास्थितीत बदल होणे गरजेचे आहे.

शिक्षण सुविधेमध्ये सुधारणा करणे अतिशय आवश्यक आहे कारण शिक्षण ही रोजगार प्राप्तीसाठीही पहिली पायरी आहे. उच्च शिक्षण घेण्याचा हेतूच मुळात उच्च रोजगार प्राप्त करणे हा असतो.

**रोजगार :**

कोणत्याही देशात रोजगाराच्या आकार त्या देशातील विकास पातळीवर अवलंबून असतो. म्हणून कोणत्याही देशाची प्रगती होतांना उत्पादनाचा विस्तार होतो आणि रोजगार संधीमध्ये वाढ होते. परंतु आर्थिक वृद्धी मध्ये आपोआप बेरोजगारी दूर होत नाही. बरेचदा तेजीच्या अर्थव्यवस्थेत बेरोजगारी वाढू शकते. बेरोजगारी ही देशासमोरील मोठी समस्या आहे. रोजगार प्राप्त करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच असते. सरकारद्वारे विविध योजनांच्या सहाय्याने रोजगार वृद्धीचे कार्यक्रम राबविले जातात. वर्ष १९९९-२००० मध्ये सरकारद्वारे योजनांच्या संख्येत घट करून ग्रामीण विकासासाठी सहा प्रमुख योजना १) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP) २) स्वयंरोजगारासाठी ग्रामीण युवक



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

प्रशिक्षण कार्यक्रम (TRVSLM) ३) ग्रामीण क्षेत्रात बाल व महिला विकास कार्यक्रम (DWCRA) ४) ग्रामीण कास्तकारांना प्रगत अवजारांचा संच पुरवठा कार्यक्रम ( SITRA) शहरी क्षेत्रात रोजगार वृद्धीसाठी सुवर्ण जयंती शहरी रोजगार कार्यक्रम ५) गंगा कल्याण योजना ६) दहा लाख विहीरी योजना (MWS)

या ऐवजी ''सुवर्ण जयंती ग्रामीण स्वयंरोजगार योजना'' नावाची एकच योजना घोषित केली गेली, यानंतर सुवर्ण जयंती ग्रामीण निवास वित्त योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, शहरी क्षेत्रात रोजगार वृद्धीसाठी सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना इत्यादी योजनांच्या मदतीने रोजगार वृद्धीचे काम कले जात आहे.

**भारतातील रोजगार प्रवृत्ती (EmploymenTrends in India)**

भारतात रोजगार प्रवृत्तीची माहिती राष्ट्रीय नमुना पाहणी संघटन (NSSO) द्वारे केलेल्या विविध पाहणीच्या आधारे प्राप्त होते. रोजगाराशी संबंधित महत्त्वपूर्ण माहिती ५५, ६१ आणि ६६ व्या फेरीच्या पाहणीनुसार उपलब्ध आहे. पाहणीदरम्यान विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तराच्या आधारे निर्देशांकाला दोन भागात विभागले जाते. श्रमशक्तीत सहभागी व श्रमशक्तीच्या बाहेर असणारे.

श्रमशक्तीमध्ये १९९३-९४ ते १९९९-२००० या काळात २.५ मिलीयन तर १९९९-२००० ते २००४-०५ या काळात ६.५ मिलीयन एवढी वाढ झाली. परंतु २००४-०५ ते २००९-१० या पाच वर्षात मात्र फक्त ३.६ मिलीयन श्रमशक्तीत वाढ झाली. २००९-१० ते २०११-१२ मध्ये मात्र श्रमशक्तीत ११.४३ मिलीयनची वाढ झाली. १९९३-९४ मध्ये श्रमशक्ती ३८१.९४ मिलीयन असतांना कार्यशक्ती ३७४.४५ मिलीयन होती म्हणजे बेरोजगार लोकांची संख्या ७.४९ मिलीयन होती. श्रमशक्तीच्या प्रमाणात बेरोजगारीचा दर २.००% होता. १९९९-२००० मध्ये बेरोजगार लोकांची संख्या ८.९७ मिलीयन तर २००४-०५ मध्ये ११.७ मिलीयन एवढी वाढली. परिणामी २००४-०५ मध्ये बेरोजगारीचा दर २.४% झाला. २००४-०५ ते २००९-१० मध्ये बेरोजगारी थोड्या प्रमाणात घटली. (२.१%) २००९-१० ते २०११-१२ मध्ये मात्र जवळपास ११ मिलीयन रोजगार संधी उपलब्ध केल्या गेल्या. २००९-१० ते २०११-१२ च्या काळात श्रमशक्ती व कार्यशक्ती यांच्या वृद्धीदरात महत्त्वाची सुधारणा झाली. २००४-०५ ते २००९-१० या काळात श्रमशक्तीत चक्रीय वृद्धीदर फक्त ०.१५% प्रतिवर्ष, तर कार्यशक्तीत चक्रीय संवृद्धी दर फक्ती ०.२१% प्रतिवर्ष होता. तर २००९-१० ते २०११-१२ च्या दरम्यान हे दर वाढून क्रमश: ९.२०% व १.१२% प्रतिवर्ष झाला. परंतु सी.रंगराजन, सीमा व विभीष यांच्या मते हे दर १९९९-२००० ते २००४-०५ च्या दरम्यान प्राप्त जवळपास ३०% प्रतिवर्षच्या चक्रीय वृद्धी दरापेक्षा बराच कमी आहे.



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

## तक्ता क्र.१
## रोजगार स्थिती १९७२-७३ ते २०१२-१३

| रोजगार स्थिती व वर्ष | ग्रामीण | | शहरी | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| **स्वयंरोजगार** | | | | | | |
| १९७२-७३ | ६५.९ | ६४.५ | ३९.२ | ४८.४ | ६०.६ | ६३.० |
| १९८७-८८ | ५८.६ | ६०.८ | ४१.७ | ४७.१ | ५४.३ | ५९.९ |
| १९९३-९४ | ५७.९ | ५८.५ | ४१.७ | ४५.४ | ५२.९ | ५६.७ |
| १९९९-२००० | ५५.० | ५७.३ | ४१.५ | ४५.३ | ५२.८ | ५५.६ |
| २००४-०५ | ५८.१ | ६३.७ | ४४.८ | ४७.७ | - | - |
| २००९-१० | ५३.५ | ५९.३ | ४१.७ | ४२.८ | ५०.७ | ५६.१ |
| **नियमित रोजगार** | | | | | | |
| १९७२-७३ | १२.१ | ४.१ | ५०.७ | २७.९ | १९.७ | ६.३ |
| १९८७-८८ | १०.० | ३.७ | ४३.७ | २७.५ | १८.६ | ६.९ |
| १९९३-९४ | ८.३ | २.८ | ४२.१ | २३.६ | १७.० | ६.३ |
| १९९९-२००० | ८.८ | ३.१ | ४१.७ | ३३.३ | १४.० | ७.३ |
| २००४-०५ | ९.५ | ३.७ | ४०.६ | ३५.६ | - | - |
| २००९-१० | ८.५ | ४.४ | ४१.९ | ३९.३ | १७.७ | १०.१ |
| २०११-१२ | १०.३ | ५.६ | ४३.४ | ४२.८ | १९.८ | १२.७ |
| **अनियमित रोजगार** | | | | | | |
| १९७२-७३ | २२.० | ३१.४ | १०.१ | २३.७ | १९.७ | ३०.७ |
| १९८७-८८ | ३१.४ | ३५.५ | १४.६ | २५.४ | २७.१ | ३४.२ |
| १९९३-९४ | ३३.८ | ३८.७ | १६.२ | २६.२ | ३०.१ | ३७.० |
| १९९९-२००० | ३६.२ | ३९.६ | १६.८ | २१.४ | ३३.२ | ३७.१ |
| २००४-०५ | ३२.९ | ३२.६ | १४.६ | १६.७ | - | - |
| २००९-१० | ३८.० | ३९.९ | १७.० | १९.६ | ३२.२ | ३६.६ |
| २०११-१२ | ३५.५ | ३५.१ | १४.९ | १९.३ | २९.४ | ३१.२ |

स्रोत : EPW Research Foundation, India. A Pocket Book of data series 2012 (Delhi, 2012) Table 16.9, Page No. 174, NSSO, 68th Round Employment & Unemployment in India 2011-12 (June 2019) Table 4, P.18.

वरील तक्त्यामध्ये NSSO च्या ६८ व्या फेरीवर आधारित वर्ष २०११-१२ ची माहिती दिली आहे. यामध्ये स्पष्ट होते की, २०११-१२ मध्ये अधिकाधिक पुरूष व महिला स्वयंरोजगार मिळणारे होते. ज्यात पुरूष श्रमिकांचे प्रमाण ५१% तर महिला श्रमिकांचे प्रमाण ५६% होते. अनियमित रोजगाराच्या संदर्भात असे दिसते की, पुरूष २९.४% व स्त्रिया ३१.२% अनियमित रोजगार प्राप्त असणारे होते. २०११-१२ मध्ये



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

एकूण श्रमशक्तीत स्वयंरोजगार, नियमित रोजगार व अनियमित रोजगाराचा वाटा क्रमश: ५२%, १८% व ३०% होता.

## आर्थिक सुधारणा काळातील बेरोजगारी (Unemployment in Post Reform Period) :

बेरोजगारी कमी करण्याच्या दृष्टीने अनेक योजना कार्यान्वित केल्या गेल्या. परंतु आर्थिक सुधारणांच्या कालावधीत बेकारी कमी होण्याऐवजी वाढली.

### तक्ता क्र. २

### १९९३-९४, १९९९-२००० व २००४-०५ मधील बेरोजगारीचे प्रमाण

(प्रति १०००)

| NSS ची फेरी | ग्रामीण पुरूष | | | ग्रामीण स्त्रिया | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | US | CWS | CDS | US | CWS | CDS |
| १९९३-९४ ५० वी फेरी | २० | ३० | ५६ | १४ | ३० | ५६ |
| १९९९-२००० ५५ वी फेरी | २१ | ३९ | ७२ | १५ | ३७ | ७० |
| २००४-०५ ६१ वी फेरी | २१ | ३८ | ८० | ३१ | ४२ | ८७ |
| | शहरी पुरूष | | | शहरी स्त्रिया | | |
| | US | CWS | CDS | US | CWS | CDS |
| १९९३-९४ | ४५ | ५२ | ६७ | ८३ | ८४ | १०५ |
| १९९९-२००० ५५ वी फेरी | ४८ | ५६ | ७३ | ७१ | ३७ | ९४ |
| २००४-०५ ६१ वी फेरी | ४४ | ५२ | ७५ | ९१ | ९० | ११६ |

US- Usual Status, CWS - Current Weekly Status, CDS - Current Daily Status

स्त्रोत : राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण चा २००४-०५ अहवाल व ६१ वी फेरी

वरील आकडेवारीनुसार बेरोजगारीचे देशातील प्रमाण लक्षात येते.

## NSSच्या ६६ व्या फेरीचे निष्कर्ष :

राष्ट्रीय नमुना पाहणी (NSS) च्या ६६ व्या फेरीमध्ये २००९-१० साठी ग्रामीण व शहरी बेरोजगारीच्या दरांचा अंदाज व त्यानुसार २०११-१२ च्या आर्थिक पाहणीनुसार UPSS व CWS पेक्षा CDS नुसार जास्त बेरोजगारी (Intermittent unemployment) आहे म्हणजे हंगामी आवर्ती बेरोजगारी अस्तित्वात आहे. UPSS आणि CWS या दोन्हीच्या आधार २००९-१० मध्ये ग्रामीण बेरोजगारीच्या तुलनेत शहरी बेरोजगारी जास्त होती. परंतु CDS नुसार मात्र ग्रामीण बेरोजगारी जास्त होती. यावरून हा निष्कर्ष निघतो की, ग्रामीण क्षेत्रात हंगामी बेकारी जास्त प्रमाणात आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

हमी योजना (MGNREGS) या सारख्या योजनांना याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

**तक्ता क्र. ३**

**वर्ष २०११-१२ साठी ग्रामीण व शहरी बेरोजगारी दर**

| अंदाज | ग्रामीण | शहरी | एकूण | एकूण |
|---|---|---|---|---|
| | २००९-१० | २००९-१० | २००९-१० | २००४-०५ |
| UPSS | १.६ | ३.४ | २.१ | २.४ |
| CWS | ३.३ | ४.२ | ३.६ | ४.४ |
| CDS | ६.८ | ५.८ | ६.६ | ८.२ |

वरील तक्त्यानुसार २००४-०५ पेक्षा २००९-१० मध्ये बेरोजगारीचे प्रमाण घटले. UPSS च्या अनुसार २००४-०५ मध्ये बेरोजगारीचा दर २.४% होता. तो २००९-१० मध्ये घटून २.१% झाला. याकाळात वास्तविक श्रमशक्तीत घट झाली. त्यामुळे रोजगार निर्मितीत घट होऊनही बेरोजगारीचे प्रमाण घटले.

**आर्थिक सुधारणेच्या काळातील रोजगार व्यूहनिती :**

आर्थिक विकासाच्या दृष्टीने भारतात प्रामुख्याने बेरोजगारीचे उच्चाटन करणे आवश्यक आहे. भारतात रोजगारावर असणाऱ्या लोकांचे प्रमाण कमी असल्यामुळे ७-८ प्रतिशत पर्यंतच असणारा आर्थिक वृद्धीचा दर बेरोजगारीच्या समस्येचे फक्त अंशत:च निराकरण करू शकतो. राजकृष्ण यांनी असे मत मांडले की लोकसंख्या व उत्पादकता सद्य:स्थितीत वाढत राहतील असे मानल्यास पुढील दोन दशकात वार्षिक ६.५% या दराने आर्थिक संवृद्धी व्हावी लागेल. रोजगार लवचिकता ०.६८ असताना त्यांनी हा अंदाज मांडला, यानंतर मात्र यात घट झाली १९९३-९४ मध्ये रोजगार लवचिकता ०.२९ तर ते २०११-१२ मध्ये ०.०४ राहिली. म्हणजे दरवर्षी ३% अतिरिक्त रोजगार निर्माण करण्यासाठी जीडीपी मध्ये जवळपास वार्षिक १८-१९% वाढ होणे गरजेचे आहे. जे वर्तमान स्थितीत भारतात शक्य नाही, म्हणजे भारतातील आर्थिक विकासामध्ये बेरोजगारीची समस्या आपोआप सुरू शकत नाही, फक्त आर्थिक विकास केंद्रीय सरकारी धोरण बेरोजगारीचे प्रमाण कमी करू शकत नाही. यासाठीच आठव्या पंचवार्षिक योजनेमध्ये विकासाचे लक्ष्य वार्षिक २.६-२.८% एवढे ठेवले. ज्यामुळे १० वर्षाच्या काळात पूर्ण रोजगार स्थिती प्राप्त होऊ शकेल.

मानवाच्या आत्मसन्मान व स्वाभीमानासाठी नवव्या योजनेत सुद्धा रोजगार वृद्धी वर भर दिला गेला. या योजनेत असेही मानले गेले की, भारतासारख्या श्रमाधिक्य असणाऱ्या अर्थव्यवस्थेत रोजगार निर्मितीसाठी फक्त बाजार शक्तीवर अवलंबून राहता येत नाही.

दहाव्या पंचवार्षिक योजनेत अतिरिक्त रोजगार निर्मितीसाठी कृषी व संबंधित



Govt. College of Arts & Science Aurangabad.
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

आहे. हाच खर्च २०१५ मध्ये ४.७% पर्यंत वाढला.

भारतात आरोग्य क्षेत्राच्या विकासासाठी अनेक योजना चालविल्या जातात जसे राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन, मध्यान्ह भोजन योजना, परिवार नियोजन कार्यक्रम यासारख्या योजनांबरोबरच मलेरिया, डायरिया, पोलिओ, क्षयरोग, डेंग्यू, चिकनगुनिया यासारख्या रोगांचा प्रसार रोखण्यासाठी विविध कार्यक्रम सतत राबविले जातात.

भारतात आरोग्य सुधारणेसाठी शासनाने विविध योजना बनविल्या. १९४६ मध्ये भोरे समितीची स्थापना केली. त्यांनी ज्या सूचना सुचविल्या त्यामध्ये प्रामुख्याने वैद्यकीय शिक्षण घेतांना सामाजिक शिक्षण दिले जावे, प्राथमिक आरोग्य केंद्रात सुधारणा ज्यात ४०,००० लोकसंख्येसाठी एक पीएचसी, यामध्ये २ डॉक्टर, एक नर्स व इतर २५-३० सहाय्यक असावेत, माध्यमिक आरोग्य केंद्राने या केंद्रांना सहाय्य करावे, त्यांच्यावर नियंत्रण ठेवावे व सहकार्यही करावे.

१९६२ मध्ये मुदलीयार समितीची स्थापना ''आरोग्य पाहणी व नियोजन समिती'' या उद्देशाने झाली. १९६३ मध्ये डॉ. एम.एस.चढ्ढा यांच्या अध्यक्षतेखाली चढ्ढा समिती स्थापली गेली. ही समिती विशेषत: मलेरिया निर्मूलन कार्यक्रमासाठी स्थापली गेली. १९६५ मध्ये मुखर्जी समिती स्थापली जी प्रामुख्याने कुटूंब नियोजन कार्यक्रमासाठी स्थापली गेली. १९६७ मध्ये जुंगलवाला समिती, १९७३ मध्ये कतारसिंग समिती, १९७५ मध्ये श्रीवास्तव समिती, १९८६ मध्ये बजाज समिती अशा विविध समित्यांची स्थापना भारतातील आरोग्य सुधारणेच्या दृष्टिकोनातून केली गेली.

दहाव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात ''राष्ट्रीय आरोग्य धोरण'' चा मसुदा तयार केला व २००२ पासून त्याची अंमलबजावणी झाली. लोकांना गुणवत्तापूर्ण आरोग्य उपलब्ध करून देणे, आरोग्य सुविधांचा दर्जा सुधारणे, भारतातील कानाकोपऱ्यात आरोग्य सुधारणांचे जाळे पसरविणे असे उद्देश यामध्ये प्रामुख्याने मांडले गेले. ज्याची अंमलबजावणी सध्याही सुरू आहे.

१९९१ ते २०१५-१६ या काळात प्रामुख्याने बदल घडून आला तो जन्मदर व मृत्यूदरामध्ये. १९९१ मध्ये २९.५ एवढा दर हजारी जन्मदर होता, २००७ मध्ये तो २३.१ , २०१० मध्ये २२.१, २०१३ मध्ये २१.४ तर २०१५-१६ मध्ये २०.८ पर्यंत येऊन पोहचला. परिणामी लोकसंख्या वाढीला निश्चितच आळा बसला आहे. ज्याप्रमाणे जन्मदर घटला, मृत्यूदर घटण्याचे प्रमाण मात्र त्यापेक्षा कमी आहे. १९९१ मध्ये दरहजारी मृत्यूदर ९.८ एवढा होता. २००७ मध्ये ७.४, २०१० मध्ये ७.२, २०१३ मध्ये ७.०० तर २०१५-१६ मध्ये मृत्यूदर ६.५ एवढा होता. म्हणजे जन्मदर व मृत्यूदर यांची तुलना करता जन्म दरातील घट ही मृत्यूदरातील घटीपेक्षा जास्त आहे. आणि याच्या अनेक कारणांपैकी



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

शिक्षणाचा प्रसार, आरोग्य सुविधांची उपलब्धता, राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठीची मनिषा हे आहेत.

**समारोप :**

१९९१ नंतर स्विकारलेल्या आर्थिक धोरणाचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये झालेला आमूलाग्र बदल यावरून निदर्शनास येतो. शैक्षणिक क्षेत्रात शासनाने केलेली प्रगती उल्लेखनीय आहे. फक्त साक्षरता दर वाढविणारे शिक्षण देणे हा हेतू यामागे नव्हता तर शिक्षणाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती व्हावी, कुशल रोजगार शक्ती वाढावी हा हेतू समोर ठेवून शासनाने पावले उचलली व ती काही प्रमाणात यशस्वी झाली. विकसित देशांच्या तुलनेत मात्र आपण खूप मागे असल्याने ती पोकळी भरून निघण्यासाठी शिक्षणावरील खर्चात वाढ करणे अपेक्षित आहे. सोबतच पुस्तकी ज्ञानासोबतच प्रयोगात्मक शिक्षण पद्धतीचा अवलंब केल्यास जास्त फायद्याचा ठरेल हे निश्चित.

रोजगार निर्मितीबाबत शासनाची भूमिका जरी आग्रही असली तरी बेरोजगारीचे वाढते प्रमाण शासन कमी करू शकले नाही यासाठी नवीन धोरणात प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**संदर्भ सूची :**


१. पंचवार्षिक योजना, भारत सरकार १९९१ ते २०११-१२.

२. Rangrajan C. Vibhish E.M. (2014) : Development in the workforce between 2009-10 and 2011-12. Economic & Political Weekly, Pg. No. 118.

३. NSS 66th Round.


□□□□□

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad